**केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- १४ जुलै, २०२२**

**संदर्भ :-**

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र: अमृत-२०१५/प्र.क्र.२०२/नवि-३३, दि. १० ऑगस्ट, २०१५.
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र: अमृत-२०१५/प्र.क्र.१९७/नवि-३३, दि.१३ ऑक्टोबर, २०१५.
३. अमृत २.० अभियानाच्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, दि. ०१ ऑक्टोबर, २०२१

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये सुमारे ५०% लोकसंख्या नागरी भागामध्ये राहात असून राज्यात एकूण ४१३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. सन २०१५ पासून राज्यात अमृत १.० योजना राबविण्यात येत आहे परंतू ती केवळ राज्यातील ४४ शहरांपुरती मर्यादीत होती. राज्य शासनाने दिनांक १४ जुलै, २०२२ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्याच्या नागरी भागामध्ये मुलभूत पायाभूत सुविधांचा अभाव दूर करण्यासाठी केंद्र पुरस्कृत अमृत २.० योजना (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation २.०) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये राबविण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतलेला आहे. सर्व शहरातील घरांना नळ जोडणी देऊन पाणी पुरवठ्याच्या बाबतीत १००% स्वयंपूर्ण करणे, जलस्त्रोत पुनरुज्जीवन व शहरातील मोकळ्या जागेमध्ये उद्याने व हरीत क्षेत्र विकसीत करणे आणि ४४ अमृत १.० शहरांमध्ये १००% मल प्रक्रिया व मलनि:स्सारण जोडणी देणे ही या योजनेची प्रमुख उद्दीष्टे आहेत. या अभियानांतर्गत देशातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु. ३५,२५० कोटी, मल नि:स्सारण प्रकल्पांसाठी रु.२७,६०० कोटी व जल स्त्रोतांच्या पुनरुज्जीवनासाठी तसेच हरीत क्षेत्र प्रकल्प विकसीत करण्यासाठी रु.३,९०० कोटी असा एकूण रु. ६६,७५० कोटी निधी केंद्रीय अर्थसहाय्याच्या स्वरुपात विविध राज्यांना उपलब्ध केला जाणार आहे. अमृत २.० अभियानाकरिता केंद्र शासनाने दि. ०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत, सदर मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात अमृत २.० अभियानाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासनाने पुढील निर्णय घेतले आहेत.

**शासन निर्णय :-**

**१.** केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यामध्ये राबविण्यास शासन मान्यता देत आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीकरिता प्रधान सचिव (नगर विकास-२) हे अभियान संचालक राहतील.

**२.** शाश्वत विकासाच्या ध्येयांमधील पाणी पुरवठ्याबाबतचे अनुक्रमांक ६ चे ध्येय गाठण्यासाठी राज्यातील सर्व शहरातील घरांना नळ जोडणी देऊन पाणी पुरवठ्याच्या बाबतीत शहरे १००% स्वयंपूर्ण करणे, जलस्त्रोत पुनरुज्जीवन व शहरातील मोकळ्या जागेमध्ये उद्याने व हरीत क्षेत्र विकसीत करणे आणि

४४ अमृत १.० शहरांमध्ये १००% मल प्रक्रिया व मल निःसारण व्यवस्था स्थापित करुन मल प्रवाहावर १००% प्रक्रिया करण्याची व्यवस्था उभारणे ही या योजनेची प्रमुख उद्दीष्टे आहेत.

**३. अमृत २.० अभियानाची व्याप्ती :-**

अमृत २.० अभियानांतर्गत राज्यातील सर्वच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश करण्यात येत आहे. अमृत २.० अभियानाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात केंद्र शासन, राज्य शासन व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रत्येक शहरासाठी सामंजस्य करार साक्षांकित करण्यात आलेला आहे.

अमृत २.० या अभियानांतर्गत राज्यातील सर्वच नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पाणी पुरवठ्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करुन प्रत्येक घरात नळ जोडणी देण्यात येईल आणि यापूर्वीच्या अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या ४४ शहरांमध्ये १००% मल नि:स्सारण व्यवस्था देखील उभारण्यात येईल.

या अभियानांतर्गत खालील घटकांसाठीचे प्रकल्प समाविष्ट करण्यात येतील.

१) मल नि:स्सारण प्रकल्प

२) सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया प्रकल्प

३) जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्प

४) हरीत क्षेत्र प्रकल्प

या अभियानाद्वारे राज्यातील शहरे पाणी पुरवठ्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण (Water Secure) बनविण्यात येतील तसेच, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन केले जाईल, त्याचप्रमाणे प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर केला जाईल व पावसाच्या पाण्याच्या साठवणूकीचे (Rain Water Harvesting) उद्दिष्ट जल सहभागातून पूर्ण केले जाईल.

४. अमृत २.० अभियानांतर्गत सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत प्राप्त होणाऱ्या केंद्रीय अर्थसहाय्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| **अ. क्र.** | **बाब** | **निधीचे प्रमाण (%)** | **केंद्रिय अर्थसहाय्य (रु. कोटी)** |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प निधी (केंद्र हिस्सा) | ८५ | ९२८५ |
| २ | सुधारणांसाठी प्रोत्साहन निधी (१००% केंद्र हिस्सा) | ८ | ७४२ |
| ३ | राज्य शासन स्तरावरील प्रशासकीय व कार्यालयीन खर्च (१००% केंद्र हिस्सा) | ३.२५ | ३०१ |
| ४ | केंद्र शासन स्तरावरील प्रशासकीय व कार्यालयीन खर्च (१००% केंद्र हिस्सा) (हा निधी केंद्र शासन स्तरावर वापरला जाईल) | १.७५ | १६२ |
| ५ | तंत्रज्ञान उप अभियान (१००% केंद्र हिस्सा) | १ | ९२ |
| ६ | माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम (१००% केंद्र हिस्सा) | १ | ९३ |
| | **राज्यास प्राप्त होणारे अंदाजित एकूण केंद्रिय अर्थसहाय्य (अ.क्र. ४ वगळून)** | **१००** | **१०,५१३** |

**५. सध्या चालू असलेल्या अमृत अभियानाचा अंतिम कालावधी :-**

सन २०१५ पासून राज्यात राबविण्यात येत असलेल्या अमृत अभियानांतर्गत सध्या चालू असलेल्या प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचे अर्थसहाय्य दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत राज्यांना मिळणार आहे, त्यानंतर केंद्र शासनाकडून सध्याच्या अमृत अभियानातील प्रकल्पांसाठी कोणतेही अनुदान दिले जाणार नाही.

**६. अमृत २.० अभियानांतर्गत प्रकल्प निधी :-**

अमृत २.० अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सादर होणाऱ्या प्रकल्पांसाठी संबंधित शहरातील लोकसंख्येनुसार केंद्रिय अर्थसहाय्याचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्रिय अर्थसहाय्याचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे (३६९) | प्रकल्प किमतीच्या ५०% |
| २ | १ लक्ष ते १० लक्ष या दरम्यान लोकसंख्या असलेली शहरे (३४) | प्रकल्प किमतीच्या ३३.३३% |
| ३ | १० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे (१०) | प्रकल्प किमतीच्या २५% (PPP तत्वावरील प्रकल्प वगळून) |

**वित्तिय आकृतीबंध :-**

अमृत २.० अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पांसाठी एकूण प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आर्थिक हिस्स्याचे प्रमाण पुढीलप्रमाणे राहील :

| नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्र हिस्सा (%) | राज्य हिस्सा (%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (%) |
|---|---|---|---|
| अ+, अ वर्ग व ब वर्ग महानगरपालिका (६) | २५ | २५ | ५० |
| क वर्ग महानगर पालिका (४) | २५ | ४५ | ३० |
| ड वर्ग महानगरपालिका (१८) | ३३.३३ | ३६.६७ | ३० |
| अ वर्ग नगर परिषद (१६) | ३३.३३ | ५१.६७ | १५ |
| ब वर्ग नगर परिषद (७३) | ५० | ४० | १० |
| क वर्ग नगर परिषद व नगरपंचायती (२९६+) | ५० | ४५ | ५ |

**७.** अमृत २.० अभियानांतर्गत प्राप्त होणारा केंद्र हिश्श्याचा निधी घटक निहाय सर्वसाधारणपणे खालील प्रमाणात विनियोगात वापरणे अभिप्रेत आहे.

| अ.क्र. | प्रकल्प घटक | केंद्रीय अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा प्रकल्प | ५२.८१% |
| २ | जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन व हरीतक्षेत्रे तसेच उद्याने विकसीत करणे | ५.८४% |
| ३ | मलनि:स्सारण व्यवस्थापन प्रकल्प उभारणे | ४१.३५% |
| | **एकूण** | **१००%** |

उपरोक्त तक्त्यातील प्रकल्प घटक निहाय केलेले निधी वितरण हे प्रातिनिधीक असून शहर स्तरावर यापूर्वीच पाणी पुरवठ्याबाबतचे मानांकन पूर्ण झालेल्या शहरांमध्ये इतर घटकांसाठी प्रकल्प घेता येतील.

राज्यामधील सर्व शहरांमध्ये पाणी पुरवठा व ४४ अमृत शहरांमध्ये मल नि:सारणाबाबत सार्वत्रिक व्याप्ती प्राधान्याने प्राप्त करण्याची जबाबदारी राज्य अभियान संचालनालयावर राहील.

**८. सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर (PPP) राबवायच्या प्रकल्पांबाबत :-**

१० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना त्यांच्या एकूण प्रकल्प किंमतीच्या १०% किंमतीचे प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर (PPP) तत्वावर घेणे बंधनकारक राहील, असे प्रकल्प कोणत्याही सुयोग्य अशा PPP मॉडेल वर हाती घेता येतील. अशा प्रकल्पांसाठी व्यवहार्यता तफावत निधी (VGF) प्रकल्प किंमतीच्या कमाल ६०% पेक्षा जास्त नसावा व त्याच्या (VGF) ५०% म्हणजे एकूण प्रकल्प किंमतीच्या कमाल ३०% मर्यादेत केंद्रिय अर्थसहाय्य पुरविण्यात येईल.

**९. स्व-हिश्श्याच्या निधीची उभारणी:-**

राज्य शासनाने तसेच, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्व-हिश्श्याचा निधी उभारतांना म्युनिसीपल बॉन्ड, कर्ज, राज्य शासनाचे अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान याचा वापर करावा. त्याचप्रमाणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना अमृत २.० अभियानांतर्गत प्रकल्प किंमतीपैकी स्व-हिश्श्याची रक्कम वित्तीय संस्थाकडून कर्ज घेऊन उभारता येईल व त्याकरिता आवश्यकतेनुसार शासनाची परवानगी घ्यावी. राज्य शासनास देखील आवश्यकतेनुसार आशियायी विकास बँक, जागतीक बँक इ. संस्थांकडून अर्थसहाय्य घेता येईल.

**१०. शहराच्या पाण्याचा ताळेबंद (City Water Balance Plan) तयार करणे :-**

राज्यातील प्रत्येक शहरासाठी पाण्याचा ताळेबंद तयार करून ते यापूर्वीच ऑनलाईन पध्दतीने केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरण्यात आले आहेत, यामध्ये जलस्त्रोत, पाण्यावरील प्रक्रिया, वितरण व्यवस्था, क्षेत्र निहाय पाण्याची उपलब्धता, बिगर महसूली पाण्याचे प्रमाण (NRW), मलनि:स्सारण वाहिन्यांची उपलब्धता व मल प्रक्रिया केंद्रांची क्षमता अशा बाबींची सविस्तर माहिती नोंदविण्यात आली आहे.

**११. शहर जल कृती आराखडा (City Water Action Plan) तयार करणे** :-

अमृत २.० अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शहर जल कृती आराखडे राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीसमोर अभियानाच्या पोर्टलव्दारे सादर करण्याची जबाबदारी अभियान संचालकांवर राहील. दशलक्षी शहरांच्या बाबतीत अशा एकूण प्रकल्पांपैकी किमान १०% प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर घ्यावेत, असे प्रकल्प शहर जल कृती आराखड्यामध्ये विशिष्टपणे दर्शविण्यात यावेत.

**१२. राज्य जल कृती आराखडा (State Water Action Plan) तयार करणे** :-

राज्य जल कृती आराखड्यामध्ये प्रकल्प निहाय आस्तित्वात असलेल्या व नव्याने प्रस्तावित केलेल्या नळ पाणी पुरवठा जोडण्यांची संख्या तसेच, अस्तित्वात असलेल्या व नव्याने प्रस्तावित मल नि:स्सारण जोडण्यांची संख्या या प्रकल्पातील फलनिष्पत्तीच्या स्वरुपात सादर केल्या जातील. सार्वजनिक भागीदारी तत्वावर समाविष्ट केलेले प्रकल्प विनिर्दिष्टपणे दर्शविले जातील. प्रकल्प निवडतेवेळी प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जमीन निर्विवादपणे उपलब्ध असल्याची खातरजमा करण्यात यावी तथापि या अभियानांतर्गत सादर करण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या किंमतीमध्ये जमिनीच्या किंमतीचा अथवा

भूसंपादनाच्या खर्चाचा समावेश करू नये परंतु, सदर भूसंपादनासाठी प्रकल्पाची आवश्यकता विचारात घेऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना राज्य शासन स्वतंत्रपणे अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेईल.

**त्रिस्तरीय संस्थात्मक व्यवस्था :-**

अमृत २.० अभियानाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय संस्थात्मक व्यवस्था असेल त्यामध्ये केंद्र शासनाच्या स्तरावर केंद्रिय सचिव, शहरी विकास मंत्रालय, यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती (Apex Committee) असेल, राज्यात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती (State High Power Steering Committee) व प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय तांत्रिक समिती (State Level Technical Committee) यांचा समावेश राहील, आणि जिल्हा स्तरावर नागरी क्षेत्रातील विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती अमृत २.० अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल व मंजूर प्रकल्पांचे संनियंत्रण करेल.

**राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती (SHPSC) :-**

अमृत २.० अभियानाची राज्यात अंमलबजावणी, संनियंत्रण व अभियानाची गतीने अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरिता मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती (SHPSC) गठीत करण्यात येत आहे:

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | **अध्यक्ष** |
| २. | अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग) | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव (नगर विकास-०१) | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव (गृहनिर्माण विभाग) | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव (पर्यावरण विभाग) | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव (वन विभाग) | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य |
| १०. | केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालयाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११. | आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय | सदस्य |
| १२. | प्रधान सचिव (नगर विकास-०२) तथा राज्य अभियान संचालक | **सदस्य सचिव** |

या व्यतिरिक्त राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती राज्य शासनाच्या अन्य विभाग / संस्थांच्या प्रतिनिधींचा सदस्य म्हणून समावेश करू शकेल आणि आवश्यकतेनुसार चर्चेसाठी संबंधित क्षेत्रातील विशेषज्ञांना निमंत्रित करू शकेल.

**राज्य उच्चाधिकार सुकाणू समितीची कार्यकक्षा :-**

१) राज्य जल कृती आराखडा मंजूर करणे व सविस्तर प्रकल्प अहवालांना प्रशासकीय मंजूरी देणे.

२) अमृत २.० अभियानातील प्रकल्प, क्षमता बांधणी, प्रसिध्दी व प्रसार तसेच सुधारणांच्या अंमलबजावणीची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावरून संनियंत्रण करणे.

३) अभियानांतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या निधी वितरणाच्या मागणीबाबत प्रस्तावाची शिफारस केंद्र शासनास करेल.

४) प्रकल्प अंमलबजावणीसाठी राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ठरवून देणे.

५) केंद्र शासनाकडून प्राप्त निधी व त्या प्रमाणात राज्य हिश्श्याचा निधी विहित कालावधीत अभियान शहरास / संबंधित अंमलबजावणी यंत्रणेस प्राप्त होण्याबाबतीत संनियंत्रण करणे.

६) तंत्रज्ञान उप अभियानाच्या माध्यमातून उद्यमारंभांना (स्टार्ट-अप्स) प्रोत्साहन देणे व खाजगी उद्योजकांना अभियानात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे.

७) सुधारणांच्या जलद अंमलबजावणीसाठी क्षमता बांधणीचा आराखडा मंजूर करणे.

८) या अभियानात उभारण्यात येणाऱ्या विविध संरचनाच्या देखभाल दुरुस्तीबाबत अभियान संचालकांना मार्गदर्शन करणे.

**राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) :-**

अभियान शहराने अमृत २.० अभियानांतर्गत तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे व निविदा प्रपत्रांचे तांत्रिक व भौतिक मुल्यांकन करण्याकरिता विविध विभाग / यंत्रणांची मिळून खालीलप्रमाणे राज्य स्तरीय तांत्रिक समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव (नगर विकास-०२) तथा राज्य अभियान संचालक | **अध्यक्ष** |
| २. | अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) | सदस्य |
| ५. | अपर मुख्य सचिव (महसूल विभाग) | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव (जलसंपदा विभाग) | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव (ऊर्जा विभाग) | सदस्य |
| ८. | आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय | सदस्य |
| ९. | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | **सदस्य सचिव** |

**जिल्हा स्तर आढावा व संनियंत्रण समिती :-**

जिल्हा स्तरावर नागरी क्षेत्रातील विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती अमृत २.० अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल व मंजूर प्रकल्पांचे संनियंत्रण करेल. या समितीमध्ये जिल्ह्यातील निर्वाचित लोकप्रतिनिधी, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. ही समिती अमृत २.० अभियानातील

उपक्रमांचा अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधिनतेने अंमलबजावणी व प्रगतीचा नियमित आढावा घेईल व आवश्यक संनियंत्रण करेल.

**१३. प्रकल्प आखणी :-**

अमृत २.० अभियानांतर्गत कार्यात्मक फलनिष्पत्ती (Functional Outcomes) साध्य करण्यावर भर देण्यात येईल व त्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी हा एक प्रमुख मार्ग असेल. त्याचप्रमाणे, प्रकल्प तयार करतेवेळी कमी उत्पन्न असलेल्या तसेच अनौपचारीक वस्त्यांचा समावेश झाला असल्याची खातरजमा करावी. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य उच्चाधिकार सुकाणू समितीसमोर सादर होणाऱ्या प्रकल्पांना मान्यता देतेवेळी राज्य जल कृती आराखड्यामधून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अपेक्षित असलेली खालील प्रमुख कार्यात्मक फलनिष्पत्ती साध्य होणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य द्यावे :

**कार्यात्मक फलनिष्पत्ती** (Functional Outcomes) **:-**

१) नळ पाणी पुरवठा जोडण्यांची सार्वत्रिक व्याप्ती (Universal) प्राप्त करणे. त्याचप्रमाणे मूळच्या ४४ अमृत शहरांमध्ये किमान २,००० कुटुंब रहात असलेल्या एका प्रभागात २४x७ नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठ्याचे प्रकल्प हाती घ्यावेत, या शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांपैकी किमान २०% प्रकल्प सदरचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता घेण्यात यावेत. अशा प्रकल्पांसाठी सुधारणांसाठी देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक अनुदानातून अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल.

२) मूळच्या ४४ अमृत शहरांमध्ये मलनि:सारणाची सार्वत्रिक व्याप्ती प्राप्त करणे आणि पाण्याच्या पुनर्वापरास चालना देणे.

३) जलसाठ्यांचे पुनरूज्जीवन करणे तसेच उद्याने व हरीतक्षेत्र विकसित करून नागरी सुविधांचे मूल्य वाढविणे.

४) अमृत २.० योजना सुरु झाल्यानंतर, संबंधित शहराने दि. ०१ नोव्हेंबर, २०२१ रोजी आखलेल्या आधारभूतरेखेपेक्षा (Baseline) सदर दिनांकानंतर अमृत योजनेशिवाय अन्य प्रकल्पांद्वारे मल नि:सारण व नळ पाणी पुरवठा जोडण्यांच्या बाबतीत प्राप्त केलेले साध्य विचारात घेऊन फलनिष्पत्ती आधारे अर्थसहाय्य (outcome based funding) करण्यात येईल.

उपरोक्त बाबींशिवाय प्रकल्प मंजूर करतेवेळी राज्य उच्चाधिकार सुकाणू समितीने खालील बाबी विचारात घ्याव्यात.

i. अभियानांतर्गत घेतलेल्या प्रकल्पांना अन्य कोणत्याही अभियानातून निधी उपलब्धतेची व्दिरुक्ती होणार नाही याची खातरजमा करावी.

ii. दशलक्षी शहरांमधील किमान १०% प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर घेण्यात यावेत.

iii. जेथे शक्य असेल तेथे ग्रामीण, शहरी समन्वय साधता येईल असे प्रकल्प समाविष्ट करावेत. प्रत्येक शहर अमृत २.० मधून मिळणारा निधी किंवा अन्य कोणत्याही अभियानाव्दारे पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत असल्याची खातरजमा करावी.

iv. एकदा वापरलेल्या पाण्यावर प्रकिया करुन त्यापैकी किमान २०% पाणी शहराच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी पुनर्वापर केला जात आहे व राज्य स्तरावर उद्योगांची किमान ४०% गरज प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापरातून भागविली जावी.

v. अभियानात सादर केलेल्या सर्व प्रकल्पांच्या बाबतीत देखभाल व दुरूस्तीचा खर्च किमान ५ वर्षासाठी समाविष्ट केलेला आहे व तो वापरकर्ता फी किंवा अन्य वसुली मार्गाव्दारे भागविला जाणार आहे आणि अशा देखभाल व दुरूस्तीचा खर्च भागविण्यासाठी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने पुरेशा उपाययोजना केलेल्या आहेत याची खातरजमा करावी.

**१४. कागद विरहीत अभियान (Paperless Mission) :-**

अमृत २.० या अभियानात शहराच्या पाण्याचा ताळेबंद (City Water Balance Plan), शहर जल कृती आराखडा (City Water Action Plan), राज्य जल कृती आराखडा (State Water Action Plan) व सुधारणांचा आराखडा (Reform Road Map) व केंद्राकडून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे या सर्व बाबी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येतील तसेच, राज्य उच्चाधिकार सुकाणू समितीच्या मान्यतेनंतर राज्य जल कृती आराखडे ३ टप्प्यांमध्ये केंद्रिय सचिव, गृहनिर्माण व नागरी विकास मंत्रालय, यांच्या अध्यक्षतेखालील गठीत शिखर समितीकडे पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात येतील.

**१५. प्रकल्पांची अंमलबजावणी :-**

राज्य जलकृती आराखड्यानुसार मंजूर करण्यात आलेले प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याची तसेच, या प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या मत्तांचे संरक्षण व जपणूक करण्याची जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील. केंद्र शासन स्तरावरुन शिखर समितीने मान्यता दिलेल्या प्रकल्पांमध्ये सर्वसाधारणपणे बदल करता येणार नाही परंतु, राज्य उच्चाधिकार सुकाणू समितीच्या मान्यतेने राज्य जल कृती आराखडयामधील एकूण प्रकल्प किंमतीच्या १०% मर्यादेत सदर आराखड्यात / प्रकल्पात बदल करता येईल.

**१६. अमृत २.० अभियानांतील प्रकल्पांवर संनियंत्रण :-**

केंद्र शासनाकडून या अभियानातील प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. ही ऑनलाईन प्रणालीच या अभियानातील निधी उपलब्धतेसाठी ग्राह्य धरली जाईल. याकरिता याबाबतचे पोर्टल नियमितपणे अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी राज्य शासन व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर राहील. या पोर्टलवर भौतिक प्रगती, वित्तीय प्रगती सोबतच केंद्र हिश्श्याचा निधी मिळविण्यासाठी आवश्यक असलेली उपयोगिता प्रमाणपत्रे, छायाचित्रे सादर करणे, चलचित्रे सादर करणे, तृतीय पक्षीय तपासणी अहवाल सादर करणे याबाबी देखील समाविष्ट असतील.

**१७. केंद्र शासनाकडून निधीचे वितरण :-**

या अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून राज्यास देण्यात येणाऱ्या निधीचे वितरण हे त्याबाबतचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यानंतर सिंगल नोडल अकाउंटमधून (SNA) अनुज्ञेय राहील. केंद्र शासनाकडून निधीचे वितरण २०%, ४०%, ४०% असे ३ टप्प्यामध्ये करण्यात येईल. राज्य जल कृती

आराखड्यास शिखर समितीने मान्यता दिल्यानंतर लगेच २०% केंद्र हिश्श्याचा निधी वितरीत करण्यात येईल. पहिल्या हप्त्याच्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर तसेच त्यासोबत इतर आवश्यक बंधनकारक कागदपत्रे सादर केल्यानंतर दुसऱ्या हप्त्याचा ४०% निधी वितरीत करण्यात येईल. तिसऱ्या हप्त्याचा निधी मंजूर करण्यापूर्वी नळ जोडण्या, मलनि:स्सारण जोडण्या, पाणीसाठे पुनरुज्जीवन प्रकल्प आणि उद्यान व हरीतक्षेत्र विकसीत करण्यासंदर्भात केंद्र शासनाने विहित केलेल्या सुत्रानुसार उद्दिष्टे साध्य केल्याचे प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

**१८. नवीन नळ जोडण्यांसाठी अर्थसहाय्य :-**

दि. ०१ नोव्हेंबर, २०२१ नंतर देण्यात आलेल्या प्रत्येक नवीन घरगुती नळ जोडणीसाठी तसेच मलनि:स्सारण जोडणीसाठी प्रत्येकी रु. ३,००० /- अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून या अभियानातील केंद्र हिश्श्यामधूनच राज्यास देण्यात येईल. नळ जोडण्यांसाठी देण्यात येणारी ही रक्कम ज्या नळ जोडण्या अमृत १.० किंवा अमृत २.० अभियानामधून हाती घेतलेल्या नसतील अशा नळ जोडण्यांसाठीच अनुज्ञेय असेल. याबाबतचे प्रस्ताव देखील ऑनलाईन पध्दतीने याकरिता केंद्र शासनाने विहित केलेल्या विशिष्ट पोर्टलव्दारे सादर करावे लागतील.

**१९. कार्यालयीन व प्रशासकीय खर्च :-**

राज्य शासनास मिळणाऱ्या केंद्रीय प्रकल्प निधीच्या ३.२५% निधी कार्यालयीन व प्रशासकीय खर्चासाठी राज्य शासनास उपलब्ध होईल. हा निधी राज्य स्तरावरील प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा जसे की, प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती करणे (पीडएमसी), राज्य स्तरावरील प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, शहर स्तरावरील किंवा गट शहरांच्या स्तरावरील  शहर अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापित करणे या प्रयोजनासाठी देण्यात येतील. सदर निधीचा वापर संबंधित शहरांमध्ये स्थापित करण्यात येणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरिता वापरता येईल. राज्य शासनाने प्रत्येक वर्षी कार्यालयीन व प्रशासकीय खर्चाचा आराखडा सादर केल्यानंतर त्या आधारे प्रत्येक वर्षात एकूण २ टप्प्यामध्ये हा निधी राज्यास मंजूर केला जाईल. राज्य शासनास मंजूर करण्यात येणाऱ्या कार्यालयीन व प्रशासकीय खर्चाच्या निधीमधून कोणत्याही प्रकल्पांसाठी जमीन खरेदी करणे, राज्य शासन किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमित कर्मचाऱ्यांचे वेतन देणे इ. बाबींवर खर्च करता येणार नाही.

**२०. सुधारणांसाठी प्रोत्साहन अनुदान :-**

सुधारणात्मक कार्यकमाच्या माध्यमातून नागरी प्रशासनात सुधारणा घडविण्यासाठी अभियान कालावधीमध्ये विविध सुधारणांची अंमलबजावणी करणे राज्य शासनावर बंधनकारक असेल. या सुधारणांमध्ये मालमत्ता कर, वापरकर्ता शुल्क, तक्रार निवारण, बिगर महसूली पाणी कमी करणे, शहराच्या किमान २०% पाण्याची गरज प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापरामधून भागविणे, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन करणे, किमान काही प्रभागांमध्ये २४ X ७ पाणी पुरवठ्याचे उद्दिष्ट साध्य करणे, उद्याने विकसीत करणे, पत मानांकन, म्युनिसीपल बॉन्ड्स, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सेवा ऑनलाईन पध्दतीने पुरविणे, पाणी व मलनि:स्सारण जोडणी मिळण्यामध्ये सुधारणा करणे, व्दिनोंद लेखा पध्दती प्रभावीपणे राबविणे, ऊर्जा बचत करणे अशा स्वरुपाच्या सुधारणांची अंमलबजावणी करावी लागेल. त्यासाठी केंद्र शासनाकडून स्वतंत्रपणे प्रोत्साहन अनुदान राज्यास मिळणार नाही.

**२१. शहरांमध्ये जी.आय.एस. आधारीत मास्टर प्लॅन व स्थानिक क्षेत्र आराखडा व नगर रचना ही उप अभियाने राबविणे :-**

५०,००० ते ९९,९९९ या दरम्यान लोकसंख्या असलेल्या सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जी.आय.एस. आधारीत मास्टर प्लॅन हे उप अभियान राबविण्यात येईल. त्यासाठीचे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून स्वतंत्रपणे देण्यात येईल. या उप अभियानाची अंमलबजावणी नगर विकास-०१ विभागामार्फत व नगर रचना संचालनालयामार्फत करण्यात येईल. स्थानिक क्षेत्र आराखडा व नगर रचना योजना या उप अभियानाची अंमलबजावणी करणे, काही विशिष्ट शहरांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी केंद्र शासनाकडून करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र निधी केंद्र शासनाकडून पुरविला जाईल. या उप अभियानाची अंमलबजावणी देखील नगर विकास-०१ व नगर रचना संचालनालयामार्फत करण्यात येईल.

**२२. पेय जल सर्वेक्षण :-**

विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चांगल्या व परिणामकारक पध्दतीने उपक्रमांची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय मंत्रालयामार्फत दर वर्षी स्वच्छ भारत सर्वेक्षणाच्या धर्तीवर पेय जल सर्वेक्षण घोषीत करण्यात येईल व त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

**२३. तंत्रज्ञान उप अभियान :-**

अमृत २ अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये स्टार्ट-अप्स संस्थांना समाविष्ट करण्यासाठी तंत्रज्ञान उप अभियान राबविले जाईल. त्याबाबतच्या सविस्तर सूचना केंद्र शासनाकडून स्वतंत्रपणे देण्यात येतील.

**२४. मार्गदर्शक प्रकल्प (Light House Projects) :-**

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्था व उद्योजकांना पाणी पुरवठा क्षेत्रामध्ये मार्गदर्शक प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी प्रोत्साहन दिले जाईल. या करिता राज्य अभियान संचालकांनी त्याबाबतचे प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाकडे सादर करणे आवश्यक असेल. सुरुवातीला अशा प्रकल्पांची अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून अशा प्रकल्पांना निधी पुरविला जाईल परंतु, त्यामधून अपेक्षित उद्दिष्टे अभियान कालावधीत साध्य केल्यानंतर प्रकल्प किंमतीच्या २०% व कमाल ५० लक्ष या मर्यादेत केंद्र शासनाकडून त्याची प्रतीपूर्ती केली जाईल.

**२५. विविध अभियानामध्ये व क्षेत्रांमध्ये एकात्मिकता स्थापित करणे :-**

नागरी क्षेत्रामध्ये निर्माण होणारे सांडपाणी प्रक्रिया करुन ग्रामीण क्षेत्रातील शेती व अन्य उद्योगांसाठी उपलब्ध करुन देता येईल तसेच, नागरी क्षेत्रामध्ये उभारलेल्या मल प्रकिया केंद्रामध्ये नजीकच्या ग्रामीण भागातील सिवेज किंवा सेप्टेजची को-ट्रिटमेंटचा खर्च विभागणी तत्वावर करता येईल आणि त्याचप्रमाणे खर्च विभागणीच्या तत्वावर विविध शहरांसाठी एकत्रितपणे पाणी पुरवठा योजनेची आखणी करता येईल. जसे की, २ शहरांसाठी उद्भवापासूनची एकत्रित पाईप लाईन टाकण्याबाबत विचार करता येईल. याशिवाय केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध अभियानांमध्ये एकात्मिक अंमलबजावणीसाठी विचार करता येईल. जसे की, अमृत २.० अभियानाच्या अंमलबजावणीमधून नागरी उपजिविका अभियानामध्ये अभिप्रेत असलेल्या क्षमता बांधणीचे उद्दिष्ट साध्य करता येईल.

**२६. क्षमता बांधणी :-**

नागरी सुधारणांची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या अभियान कालावधीत वैयक्तीक व संस्थात्मक क्षमता बांधणीचे उपक्रम हाती घेण्यात येतील. यामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विविध अधिकारी / कर्मचारी व लोकप्रतिनिधी, कंत्राटदार, सल्लागार, प्लांट ऑपरेटर्स, प्लंबर्स, वर्कमन, स्वयं सहाय्यता गट, नगर रचनाकार यांच्याकरिता क्षमता बांधणी कार्यक्रम हाती घेण्यात येईल व त्याबाबतचा खर्च कार्यालयीन व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र शासनाकडून राज्यास देण्यात येणाऱ्या अनुदानामधून करण्यात येईल. अशा तऱ्हेने राज्यामध्ये सुमारे १०,००० व्यक्तींची क्षमता बांधणी करणे अभिप्रेत आहे.

**२७. माहिती, शिक्षण व प्रसारण मोहिम (IEC) :-**

सदर अभियाना बद्दल जनजागृती व प्रसार करण्यासाठी प्रसिध्दी व प्रचाराबाबतची मोहिम राबविता येईल. याबाबतच्या सविस्तर कार्यवाहीबाबतच्या सूचना केंद्र शासनाकडून देण्यात येतील. अमृत २.० अभियानाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विहित केलेल्या विविध माहिती, शिक्षण व प्रसारण कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**२८. राज्य अभियान संचालक :-**

अमृत २.० अभियानाची राज्यात अमंलबजावणी करण्यासाठी राज्य अभियान संचालक म्हणून प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२ यांना नियुक्त करण्यात यावे तसेच अतिरिक्त राज्य अभियान संचालक म्हणून आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना व संबंधित सह सचिव / उप सचिव यांना प्राधिकृत करण्यात यावे. अतिरिक्त राज्य अभियान संचालक यांच्यावर सोपवावयाच्या जबाबदाऱ्यांचा तपशील राज्य अभियांन संचालक यांनी निश्चित करावा.

**२९. त्रयस्थ आढावा व संनियंत्रण संस्था (IRMA) :-**

केंद्र शासनाकडून प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र त्रयस्थ आढावा व संनियंत्रण संस्थेची (Independent Review and Monitoring Agency) निवड करुन देण्यात येईल. त्यांच्यामार्फत राज्यात अंमलबजावणी होणाऱ्या प्रकल्पांचा त्रयस्थ आढावा घेतला जाईल.

**३०. प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) :-**

अमृत २.० अभियानासाठी केंद्र शासनाने विहित केल्यानुसार व त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या मॉडेल आरएफपी नुसार प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) संस्थेची नियुक्ती करण्यात येईल.

**३१. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) :-**

अमृत २.० अभियानांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून खाजगी सल्लागारांची नियुक्ती करण्यास स्थानिक स्वराज्य संस्थांना मुभा राहील. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना प्रचलित धोरणानुसार कमाल ३% मर्यादेत प्रकल्प व्यवस्थापन शुल्क आकारण्यास अनुमती राहील, यासाठीचे निकष नगर विकास विभागाच्या स्तरावरून निश्चित करण्यात येतील.

**३२. तांत्रिक मान्यता शुल्क प्रकल्प किंमतीत समाविष्ट करण्याबाबत :-**

प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना प्रशासकीय मान्यता देताना प्रकल्प किंमतीमध्ये तांत्रिक मान्यतेचे शुल्क अंतर्भूत करण्यात यावे.

**३३. अमृत अभियान संचालनालय :-**

अभियान संचालकांच्या मदतीसाठी राज्य स्तरावर अमृत अभियान संचालनालय स्थापन करण्यात यावे. त्यामध्ये आवश्यक त्या क्षेत्रातील सल्लागार व इतर आवश्यक मनुष्यबळ, सल्लगार संस्था तसेच, सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्यामधून मानधन तत्वावर नेमण्यात यावेत व त्यांच्या मानधनावरील खर्च अमृत अभियान २.० अंतर्गत प्राप्त होणाऱ्या कार्यालयीन व प्रशासकीय खर्चाच्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

**३४. विभाग स्तरावरील अभियान व्यवस्थापन कक्ष :-**

प्रत्येक महसूली विभाग स्तरावर संबंधित विभागाच्या सह आयुक्त, नगर परिषद प्रशासन, यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करावा.

**३५. शहर स्तरावरील अभियान व्यवस्थापन कक्ष :-**

राज्य अभियान संचालनालयाच्या धर्तीवर प्रत्येक महानगरपालिका स्तरावर संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली शहर अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात यावा.

**३६. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व शहर अभियान कक्ष :-**

सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्या जिल्ह्यातील सर्व नगर परिषदा व नगर पंचायती यांच्यासाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात यावा तसेच, संबंधित नगर परिषद / नगरपंचायतीच्या स्तरावर अभियान शहराच्या मुख्याधिकारी, नगर परिषद / नगरपंचायत यांच्या अध्यक्षतेखाली शहर अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात यावा.

**३७. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी :-**

अमृत २.० या अभियांनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रकल्पांचे राज्य स्तरीय तांत्रिक समितीसमोर सादरीकरण करणे, प्रशासकीय मान्यता मिळाल्यांनतर निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे व प्रकल्पांची अंमलबजावणी करणे, प्रकल्प पूर्ण करणे, त्यातील उद्दीष्टे पूर्ण करणे, पेय जल सर्वेक्षणामध्ये सक्रियपणे सहभागी होणे, सर्व सुधारणांची वेळेत अंमलबजावणी केली जाईल याची दक्षता घेणे इ. सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील.

**३८. मॉडेल निविदा प्रपत्र :-**

अमृत २.० या अभियांनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मॉडेल निविदा प्रपत्र प्रधान सचिव, (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य स्तरीय तांत्रिक मान्यता समितीच्या मान्यतेने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करून देण्यात यावे.

**३९. जी.आय.एस. आधारीत मास्टर प्लॅन :-**

अमृत २.० या अभियांनाअंतर्गत ५०,००० ते ९९,९९९ या दरम्यान लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी जीआयएस आधारीत मास्टरप्लॅन करण्याच्या उपअभियांनाची अंमलबजावणी संचालक, नगर रचना यांच्याशी समन्वयाने करावी.

**४०. स्थानिक क्षेत्र आराखडा (Local Area Plan) व शहर विकास योजना :-**

या अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून निवडक शहरात राबविण्यात येणाऱ्या स्थानिक क्षेत्र आराखडा व शहर विकास योजना उप अभियानाची संचालक, नगर रचना यांच्याशी समन्वयाने राबवावे.

**४१.** अमृत २.० अभियानाची अंमलबजावणी सुरू असेपर्यंत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातून संबंधीत शहरांना शक्यतो नवीन पाणी पुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्प मंजूर करु नयेत.

**४२.** यापूर्वी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातून तात्पुरत्या स्वरूपात मंजूर केलेले व भविष्यात अमृत २.० मधून निधी वितरण करण्याचे ठरलेले, औरंगाबाद पाणी पुरवठा प्रकल्प, मनमाड पाणी पुरवठा प्रकल्प, उस्मानाबाद मलनि:स्सारण प्रकल्प तसेच अमृत अभियान लागू झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ नंतर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातून मंजूर केलेले पाणी पुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्प शक्यतो अमृत २.० अभियानात समाविष्ट करण्यात यावेत व त्यांना अमृत २.० अभियानातून निधी वितरण करावे.

**४३.** अमृत २.० अभियानाकरिता केंद्र शासनाने संदर्भाधीन दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांनुसार अभियानाची राज्यात अंमलबजावणी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक २०२२०७१४१२५६०६८६२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SHRIKANT C ANDGE

Digitally signed by SHRIKANT C ANDGE
DN: cn=SHRIKANT C ANDGE, o=Mantralaya, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, email=shrikant.andge@nic.in, c=US
Date: 2022.07.14 23:23:50 +05'30'

**(श्रीकांत चं. आंडगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्य मंत्री, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्य मंत्री, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, नगर विकास (नवि-१), मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२), मंत्रालय, मुंबई.

११. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गो. ते. रुग्णालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, जलसंपदा विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, ऊर्जा विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, वने विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव, ग्राम विकास विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१९. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा), पुणे.
२०. सर्व विभागीय आयुक्त.
२१. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
२२. सर्व जिल्हाधिकारी.
२३. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
२४. संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण संचालनालय, पुणे.
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत.
२६. निवड नस्ती, नवि-३३.